नि.फौ.ख क्र.१५०/२०२१
सरकार -वि- अमित सोनटक्के
निशाणी क्र.७१

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३०७ व ३१२ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः विशाल वसंत सुशिर,

वय: २७ वर्षे, व्यवसाय: मजुरी,

राहणार- धरणगाव, तालुका-मलकापुर, जिल्हा-बुलडाणा.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. के.व्ही गारमोडे यांचेमार्फत**

०१. मी न्यायालयात हजर चारही आरोपींना ओळखतो. घटना अंदाजे चार-पाच वर्षापूर्वी दुपारी ०४.०० ते ०५.०० वाजताचे दरम्यान धरणगाव येथील मराठी शाळेसमोर घडली होती. त्यावेळी माझे आरोपीं सोबत बोलचाल झाली होती. याव्यतिरिक्त काही घडले नव्हते. मी त्यावेळी घटनेचे अनुशंगाने रिपोर्ट दिला होता. आता मला दिनांक ०६/०५/२०२० रोजीची तक्रार व छापील पहिली खबर दाखवण्यात आली. त्यावर माइ-या सह्या आहेत. परंतु, त्यातील मजकुर मला माहिती नाही.

०२. असे घडले नव्हते की, घटनेचे वेळी आरोपी क्र.०१ ने मला लाकडी काठीने माझे डोक्यात मारहाण केली व आरोपी क्र.०२ ते ०४ ने मला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली होती आणि आरोपींनी मला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली होती.

**( साक्षीदार हा अभियोगपक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन त्याला सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी भारतीय साक्ष अधिनियम २०२३ चे कलम १५७ नुसार देण्यात येत आहे. )**

०३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.०५.२०२० रोजी संध्याकाळी ०७.१५ ते ०७.३० वाजताचे दरम्यान मी धरणगाव येथील भैरवनाथ मंदिराजवळ उभा असताना चारही आरोपी तेथे आले होते, त्यावेळी दारू पिण्याचे कारणावरून त्यांचेपैकी आरोपी क्र.०१ याने लाकडी काठीने माझे डोक्यात मारहाण केली होती, तर

आरोपी क्र.०२ ते ०४ यांनी मला चापटाबुक्क्यांनी मारहाण केली होती, त्यावेळी सर्व आरोपींनी मला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली होती, सदर घटनेचे अनुशंगाने मी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता, त्यासंबंधी पोलीसांनी माझेकडे चौकशी करून माझे बयान नोंदविले होते, घटनेचे वेळी आरोपींनी मला मारहाण केल्यामुळे पोलीसांनी मला दवाखान्यामध्ये वैद्यकीय उपचार घेण्याकरिता पाठविले होते.

०४. आता मला माझी फिर्याद व बयानातील अधोरेखांकीत **भाग-अ व भाग-ब** मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना फिर्याद व बयान देते वेळी सांगितला नव्हता. तो पोलीसांनी माझी फिर्याद व बयानामध्ये का नमुद केला, याचे कारण मी सांगु शकत नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुतचे प्रकरण आरोपींसोबत न्यायालयाबाहेर मिटवले आहे, मला प्रस्तुत केस मध्ये इतर साक्षीदार घेण्याची इच्छा नाही, मला प्रस्तुतची केस चालवायची नाही व माझी आरोपींविरूध्द तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतचे प्रकरण आरोपींसोबत न्यायालयाबाहेर मिटविल्यामुळे त्यांना वाचविण्याकरिता मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

**सरतपासणी पुर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.०१ व ०२ तर्फे विधीज्ञ श्री.यु.व्ही. कपले यांनी नाकारला.**

**उलटतपास- आरोपी क्र.०३ व ०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.बी. तायडे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2026.07.09 18:16:44 +0530

**स्थळ : मलकापुर**
**दिनांक : ०९.०७.२०२६**

**(सुनिल स. महाले)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
मलकापूर.